


Kings
Kings

# औद्योगिकरणानंतरची परिवर्तने

**वैजयन्ती राव**

समकालीन मुंबईतील नागरिकत्वाचा काल्पनिक भविष्यकाळ दक्षिण आशियाई शहरांचा पुनर्विचार

सध्याच्या नगरविषयक अभ्यासामध्ये शहरांचा ढासळत जाणाऱ्या स्थितीकडे अधिक लक्ष दिले जाते आहे. आधुनिकतेचे प्रतीक आणि ठिकाण म्हणून समजले जाणारे शहर आणि सामाजिक स्थित्यंतराचे महत्त्व यांमधील परस्परसंबंध खूपच बदलले आहेत, कारण सामाजशास्त्र आपल्या प्रमाण दृष्टिकोन ठरवते आणि त्याआधारे समकालीन शहरातील परिस्थितीमध्ये आशेचा किरण दिसतो का, हे शोधण्याची पराकाष्ठा करते. झपाट्याने होणारे नागरीकरण आणि ग्रामीण जनतेच्या तुलनेत शहरी जनतेत होणाऱ्या नाट्यपूर्ण बदलाचे गुणोत्तर यांच्या संदर्भात, संशोधन, वादविवाद आणि हरकती याकरिता शहरे उत्तम व्यासपीठ ठरू पहात आहेत. शहरांनी उदाहरणादाखल मांडलेल्या समस्या (किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, शहरातील दुर्धर परिस्थिती) मग त्या सामाजिक, सांस्कृतिक किंवा पर्यावरणीय असोत - केवळ संशोधनाची दिशा (उदा. ब्रूस माऊसचे अलिकडचे पुस्तक 'मासिव्ह चेंज') ठरवीत नाहीत तर, समाजशास्त्रीय पद्धतीतील कल्पनांचा फेरविचार करण्यासही प्रवृत्त करतात. (उदा. अमिन आणि थ्रिफ्ट्स सिरीज - रिइमॅजिनिंग द अर्बन). एकोणिसाव्या शतकातील आधुनिक सामाजिक सिद्धांताच्या विकासामध्ये सामाजिक संकल्पना आणि स्थान समजून घेताना शहरांकडे दुर्लक्ष झाले असल्याचे असंख्य लेखकांनी निदर्शनाला आणून दिले आहे. याच विचारधारेचा एक भाग म्हणून आपण मुंबईसारख्या शहरातील स्थितीकडे अधिकाधिक लक्ष दिले जात असल्याचे पाहतो आहोत. जर पॅरिस शहराला आधुनिक राजधानी मानले जात असेल तर (वॉल्टर बेंजामिनसारख्या लेखकाने, जो ऐतिहासिक वैशिष्ट्य या नात्याने आधुनिकता समजून घेण्यासाठी शहरातील अनुभवांचे केंद्रवर्ती महत्त्व समजून घेणाऱ्या विसाव्या शतकाच्या प्रारंभ काळातील काही विचारवंती का एक विचारवंत होता.) मुंबई, लागोस, दुबई इत्यादींसारखी शहरे, समकालीन शहरी परिस्थिती जाणून घेण्याकरिता आत्ता उदाहरणीय शहरे ठरली आहेत. उदाहरण घ्यायचे झाले तर मुंबई येत्या काही वर्षांमध्ये महाकाय शहरी जनसमुदाय या नात्याने ओळखली जाईल.

म्हणूनच या शहरांविषयी लिखाण करणे, सर्वप्राथम्याचे ठरले आहे. पण हे लिखाण कोणत्या शास्त्रीय दृष्टिकोनातून करावे, हे त्वरित शोधले पाहिजे.

दक्षिण आशियातील सांस्कृतिक इतिहासकारांनी त्याचे लक्ष शहरांकडे वळवले असल्यामुळे, आधुनिक दक्षिण आशियाबाबतच्या लिखाणामध्ये शहर हे मूलभूत घटक किंवा ऐतिहासिकदृष्ट्या 'नैसर्गिक स्थान' म्हणून सहजासहजी मानले जात नसल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

दक्षिण आशियाई समाजात गाव हे नैसर्गिक आणि अतिशय विश्वसनीय ठिकाण मानले जात असे. आणि साहजिकच राष्ट्रासंबंधीच्या लिखाणामध्ये शहरांना सुस्पष्ट महत्त्व दिले जात असे. परिणामी, नागरी व्यवहारासंबंधीच्या धोरणांमध्ये सुधारणा करण्याकडेही दुर्लक्ष झाले आहे. तरीही, भारतातील बहुतांश जनता गावांमध्ये राहत असतानाही, नागरी प्रश्न इतिहासाशी विसंगत राहून ठळकपणाने पुढे आले. या बदलामागे विविध कारणे आहेत आणि 1992 सालच्या अखेरीस आणि 1993च्या प्रारंभी मुंबईमध्ये झालेल्या भीषण जातीय दंगली आणि अगदी अलिकडे झालेले विविध दहशती हल्ले आणि शहराला भेडसावणाऱ्या शांतताभंगाच्या घटना यामुळे या बदलांमध्ये मुंबई शहर केंद्रभागी आले आहे.

या निबंधामागे मी मुंबईच्या वर्तमान कालावधीतील परिवर्तनावर (म्हणजेच 90च्या दशकाच्या प्रारंभापासून आत्तापर्यंतच्या कालावधीतील) जो प्रामुख्याने औद्योगीकरणोत्तर कालावधी आहे. लक्ष केंद्रीत करणार आहे, त्यामुळे भारतातील आणि भारताबाहेरील शहरांवरील चर्चेमध्ये मुंबईचे केंद्रीभूत स्थान निदर्शनास येईल. दुसरे असे की, असे करण्यामुळे ज्या परिवर्तनाद्वारे मुंबई हे भारतातील एकमेव आणि उदाहरणीय शहर ठरले, त्या परिवर्तनाचे स्वरूप उघड करता येईल. जागतिकीकरण ही परिणामांची मालिका असते, असे जर आपण गृहीत धरले तरी, ती वानगीसाठी उदाहरणे ठरतात, कारण ती उदाहरणीय शहरांचे अनुकरण करण्याऐवजी अस्थिर प्रायोगिक क्षेत्रे असतात. या युक्तिवादाच्या अनुषंगाने मी उदारीकरणाच्या काळात, मुंबईत झालेल्या जागेसंबंधीच्या परिवर्तनावर लक्ष केंद्रित करणार आहे. मुंबईतील भूभागाचा मूलपाठ म्हणून आणि उदयाला येणाऱ्या शहरी संकल्पनाचे चिन्ह म्हणून वास्तुशास्त्र व संरचनाशास्त्र यांसह विचार करताना, नियोजन, विकास आणि संकल्पचित्र यांमधील 'नेहमीच्या' किवा 'संयुक्तिक परस्परसंबंध विपरीत करण्याच्या प्रयत्नाद्वारे काम करण्याचा माझा मानस आहे त्यामुळे मुंबईच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिकतेचा युक्तिवाद पुढे मांडला जाईल. थोडक्यात, हा निबंध शहराची ढासळती स्थिती, शहरांचे स्वरुप आणि जागेसंबंधीचे परिवर्तन आणि सामाजिक बदल यांमधील नातेसंबंध याच मुद्यांकडे परत वळवता येईल.

**बॉम्बे वरून मुंबई**

त्यावेळी राज्य शासन तसेच मुंबई महानगरपालिका या दोन्ही ठिकाणी सत्तास्थानी असणाऱ्या शिवसेना या राजकीय पक्षाने 1996 मध्ये बॉम्बेचे मुंबई असे पुनर्नामकरण केले या प्रसंगापूर्वी 10 वर्षांहून अधिक काळापासून घडून येत असलेल्या अन्य प्रकारच्या बदलांचे ते एक लक्षणच मानले पाहिजे. नेमकेपणाने बोलायचे तर डिसेंबर 1992 मध्ये अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्यानंतर झालेले दंगे आणि मार्च 1993 मध्ये झालेली बॉम्बस्फोट मालिका यांमध्ये 250 हून अधिक बळी गेले आणि मालमत्तेचे तर अतोनात नुकसान झाले, हे सर्व शहराच्या मानसिक स्थित्यंतराचे परिणामस्वरुप होते. या घटनेनंतर प्रसिद्ध झालेल्या कित्येक लिखाणांच्या शीर्षकामध्ये या स्थित्यंतराचे पडसाद उमटले - फ्रॉम बॉम्बे टू मुंबई, बॉम्बे अँड मुंबई ए सिटी इन ट्रान्झिशन अँड वेजेस ऑफ व्हायोलन्स - नेमिंग अँड व्हायोलन्स इन पोस्ट कॉलॉनियल बॉम्बे, बाबरी मशीद पाडल्यानंतर मुंबईवर प्रसिद्ध झालेल्या साहित्यकृतीचे लेखक आणि प्रकाशक यांना बॉम्बे आणि मुंबई या दोन भिन्न संकल्पनाच वाटल्या होत्या, त्यातील प्रत्येक नावामागे विशिष्ट प्रणाली आणि त्याहून महत्त्वाची अशी विशिष्ट प्रकारची नीतिमूल्ये असल्याचा विश्वास होता. बहुतांश समाजशास्त्रीय लिखाणामध्ये बॉम्बेची आधुनिकता आणि त्याची सार्वत्रिक नीतिमूल्ये गृहीत

धरली होती. (उदा. सुजाता पटेल यांच्या प्रकाशनाचे शीर्षक - बॉम्बे - मेटफोर फॉर मॉडर्न इंडिया) पण अर्जुन अप्पादुराई यांनी हा सार्वत्रिकतेचा आशय निश्चितच कायम नसल्याचे निदर्शनाला आणून दिले. त्यांनी, भिन्न भाषिक, भिन्नवंशीय आणि भिन्न प्रादेशिक गटांमधील सामाजिक नातेसंबंधाच्या शक्यतेवर आधारलेली विविधतेची सीमा असेच त्याचे वर्णन केले आहे. अप्पादुराई यांच्या शब्दात बॉम्बेचे नेमके वर्णन व्यापाराचे विश्वस्थिती / सार्वत्रिकता असे करता येईल.

व्यक्ती, व्यक्तीच्या मालकीच्या वस्तू आणि मालमत्ता यांच्या संबंधातील हिंसाचार हा, विद्वानांच्या तसेच प्रसिद्ध लेखकांच्या मते मुंबईच्या इतिहासात परिवर्तन बिंदूच ठरला. पण असा अर्थ लावण्यामुळे मुंबईचा इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा प्रातिनिधिक उद्गाता ठरला. त्यांच्या मते, 1992-93च्या दंगलीतील भयावहरित्या व्यक्त झालेल्या जाती-जातींमधील संघर्ष हा राष्ट्रीय पातळीवरील जातीय संबंधांमधील बिघाडाचे अलंकारिक सूचक चिन्ह होते. शहरी नातेसंबंधाचा नेमकेपणा हा या भिन्नमताचा ठळक मुद्दा ठरू शकत नाही. (यासंबंधीचे अपवाद अर्जुन अप्पादुराई आणि थॉमस हॅन्सेन या दोन्ही मानवशास्त्रज्ञांच्या लिखाणात आढळतात हॅन्सेनने हिंसाचार आणि शिवसेनेने खतपाणी घातलेली रणनीति यांच्यामधील संबंधावर समस्येच्या संदर्भात अवकाश आणि नागरी संरचना यांच्या 'भारी' प्रश्नाकडे लक्ष वेधत आहेत.) निराळ्या शब्दात सांगायचे झाले तर, मुंबईला केंद्रवर्ती मानून केलेल्या लिखाणामध्ये मुंबईवरील अरिष्ट राष्ट्रीय अरिष्ट ठरण्याचीच शक्यता अधिक वाटते. राष्ट्रीय इतिहासातील ते एक संशयास्पद स्थान असल्यामुळे शहराची ही ओळख ठरली आहे. पार्थ चॅटर्जीच्या मते, वसाहतीविरोधी राष्ट्रीय विचारधारेमध्ये शहराला 'मूलभूत प्रतिमा' नव्हती. म्हणजेच मुंबईसारख्या शहराचा नितीमूल्यांच्या विचार संमिश्र भावनेने करायला हवा. वसाहतीवादी राजधानी म्हणून निर्माण केलेल्या मुंबईसारख्या शहरामध्ये आधुनिक जागतिक संस्कृतीत सामील होण्याची एक संधी, तसेच राष्ट्रीय काल्पनिक पण आधुनिक स्थान निर्माण करण्यासंबंधीच्या उत्कंठाकाळात दक्षिण आशियाई शहर शोधनिर्मित ठरले आहे. तरीही प्रारंभीच्या या काळात राष्ट्रासंबंधीच्या विचारविनिमयात दुय्यम ठरले आहे. त्याचबरोबर शहरातील तणावाकडे, राजकीय कारकीर्दीच्या सार्वभौमत्त्वाच्या संदर्भात वाढत्या संमिश्र भावनेचे आणि सार्वभौमित्वाच्या प्रश्नावरून राष्ट्र - राज्यामधील घटत जाणाऱ्या क्षमतेचे द्योतक म्हणून पाहिले जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, शहरांमधील तणाव राष्ट्रीय तणावामध्ये उमटतो व त्या तणावाचे कळसूत्री रुप ठरतो, त्याचबरोबर या प्रश्नांमधील मध्यस्थ म्हणून राष्ट्र-राज्यांमधील वाढत्या ... चा सूचक ठरतो. हिंसाचारामुळे ज्या शहराचे तुकडे पडतात, ते शहर वेगळ्याच प्रकारचे असते. राष्ट्र - राज्यांमधील नितीमूल्ये आणि प्रथा यांचा पगडा असणाऱ्या सुस्पष्ट प्रणालीमध्ये बाधलेले असते. औपचारिक, सौंदर्यशास्त्रीय विचारांनी बांधलेले व्यवस्थित शहर असते. हिंसाचार, विस्थापन आणि स्थानांतरण हे प्रमुख भारतीय शहरांतील दैनंदिन जीवनाचा एक भागच ठरला असल्यामुळे जागेसंबंधीच्या प्रश्नाला अनोखे महत्त्व प्राप्त झाले आहे.

वंशशास्त्रामध्ये मला आत्तापर्यंत शहरांकडे दुर्लक्षच झाल्याचे आढळले आहे. कारण वसाहतवादानंतरच्या भारतीय समाजात, स्वयंघटित सांस्कृतिक ठिकाण म्हणून, नाकाराव्यात नेहरू युगातील ग्रामीण संरचनेच्या उदात्तीकरणाभोवती गुंतलेल्या विकासाचे तंत्र विफल ठरल्याच्या परिणामांना तोंड देण्यात शहरे व्यस्त असल्याची आढळली. कलकत्ता, मुंबई, नवी दिल्लीसारख्या शहरांमध्ये 70 व 80 च्या दशकांचे राज्यपुरस्कृत विस्थापन मोहीम राबवल्यामुळे ग्रामीण गरीबीचे परिणाम दृष्टोत्पत्तीस आले. या राज्यांमधील संबंधीत व्यक्ती आणि बिगर सरकारी संघटना यांनी केलेल्या विरोधामुळे फुटपाथवासियांना आणि झोपडपट्टीधारकांना किमानपक्षी मानवतावादी दृष्टिकोनातून आणि राजकारण्यांकरिता त्यांच्यामधून तथातथित मताच्या बँका तयार करण्यासाठी, त्यांचे हक्क अबाधित ठेवले गेले. अशा प्रकारे आधुनिक स्वयंरचनेच्या आदर्शवत सांस्कृतिक आदर्शच नव्हे तर

लोकशाही सेवेतील शहरी राजकारणातील आदर्शवत संघटना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील दक्षिण आशियाई शहराच्या काल्पनिक इतिहासाचे पुरेसे वर्णन करू शकणार नाहीत.

टीकाकारांनी, व्यावसायिकांनी आणि बेंजामिनपासून ले कॉरबूझर पर्यंतच्या सिद्धान्तवाद्यांनी त्यांच्या लिखाणात ठामपणे नमूद केल्याप्रमाणे, आधुनिक शहरांच्या वसाहतवादी वंशशास्त्राचे वास्तुशास्त्रीय कल्पना आणि शहरी संकल्पचित्रे महत्त्वाची ठरतात. तरीही, दक्षिण आशियाई शहरांच्या (आणि विशेष करून भारतीय शहराच्या) बाबतीत भूतल (सरफेस) भूचित्र, संकल्पचित्र आणि संघटनात्मक कृती यांना अभ्यासाविषय म्हणून क्वचितच महत्त्व देण्यात आले होते. त्यांना ज्यामधून इतर उद्दिष्टांविषयीचे पूर्ववृत्त सांगता येईल अशी लक्षणे आणि खुणाच मानण्यात आले होते. तथापि, सध्याच्या परिस्थिती त्याकडे दुर्लक्ष करण्यामुळे, त्याकडे डोळेझाक केली जाते आहे, असे समजण्यास वाव मिळेल. सध्याच्या काळातील या अपरीमित विरोधाभासामुळे दृश्यमानतेचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला आहे, त्याचे परिणाम शहरांमध्ये दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत समाजशास्त्रीय दृष्टीने शोध घेणे सहजी शक्य होणार नाही. भारतीय शहरांचे भूचित्र आणि भूतल यांच्या माध्यमातून विचार करणे म्हणजे रुपांतरणाचा दृश्यमान अभ्यास करणे होय. येथे दृश्यस्वरुप पहाणे म्हणजे अतिरिक्त भूतलाचा दुसऱ्या प्रकारे विचार करणे ठरेल.

सर्वसाधारणपणे भूपृष्ठ आणि भूचित्र याचे, संकल्पचित्र आणि कृती यांचे प्रश्न, जी गती सभोवतालची परिस्थिती घडवते ती सद्यकाळात बदलली असताना समाजशास्त्रामध्ये केंद्रवर्ती प्रश्न ठरले आहेत. या प्रश्नांची सांगड, पुराभिलेखांची उपलब्धता आणि भूतकाळातील महत्त्वाच्या शक्यता यांच्याशी घातली जाते, पण उत्कृष्ठ वर्णनपर मर्दुमकीच्या कृत्यांमधून किंवा पुरातन स्मारकांमधून मांडणे आधिकाधिक कठीण होत आहे. इतिहास व संस्कृतिविषयक अभ्यास करणाऱ्या अलिकडच्या विविध ग्रंथांमध्ये या प्रश्नांना अगोदरच केंद्रस्थानी मानण्यात आले आहे. उदा. ख्रिस्तिन बॉयलरचे 'सिटी ऑफ कलेक्टिव्ह मेमरी, समकालीन जोहान्सबर्गवरील अर्चिल बेम्बेचा लेख, 'द एस्थेटिक्स ऑफ सुपरफ्युईटी' आणि अकबर अब्बासचा ग्रंथ हाँगकाँग - कल्चर इन स्पेस ऑफ हिसॲपिरियन्स. औद्योगिकरणानंतरच्या भूपृष्ठ आणि भूचित्राच्या चष्म्यामधून समकालीन मुंबईकडे पाहताना, या प्रश्नांची सांगड घालण्यात मला विशेष स्वारस्य आहे. मी यापूर्वी म्हटल्याप्रमाणे एक ठिकाण म्हणून मुंबईतील माझे कुतुहल भावी उदाहरण म्हणून तिच्यामध्ये असणाऱ्या क्षमतेमुळे नव्हे तर, भारतातील समकालीन नागरीकरणाचा आवाका ज्यामुळे निश्चित झाला त्या मुंबईच्या आत्यंतिक प्रायोगिकतेमुळे जागृत झाले आहे.

## वास्तुशास्त्राच्या माध्यमातून विचारविमर्श

''आपण अदृष्य कारकीर्दीच्या उंबरठ्यावर उभे आहोत. त्यामध्ये अफाट शहरी संचरना निश्चित केली जाते. दृश्य स्वरुप अन्य घटकांच्या प्रभावातून तयार होते, नकाशा वापर करणाऱ्यास अधिक प्रभावी रेषा आढळतात, केंझिस व्हर्नेलिस, 'द सिटी बियाँड मॅप्स'.

जर शहरांच्या नकाशाद्वारे शहरांच्या आकारमानाचे प्रभाव किंवा शहरवासियांची राजनैतिक क्षमता आणि अपेक्षा प्रतिबिंबित होत असतील तर, गॅहॅम आणि मार्विन ज्याला, 'तुकड्यांमधील नागरीकरण' म्हणतात. ते मुंबईसारख्या शहरांच्या नकाशांमधून प्रतिबिंबित होईल, त्याचा संबंध अगदी अलिकडच्या भांडवलवादी राजकीय अर्थव्यवस्थेतील नव-उदारमतवादी टप्प्याशी असतो. वर नमूद केल्याप्रमाणे भारतीय शहरांच्या संक्षिप्त वंशशास्त्राच्या आधारे, वास्तुशास्त्राच्या नेहमीच्या पद्धतीद्वारे निराळ्या प्रकारे विचार करणे, शक्य होईल, आणि शीघ्र संस्थात्मक परिवर्तनाच्या काळात विशेषत्वाने, त्याचा समावेश संघटनात्मक धोरणामध्ये करता येतो. अलिकडच्या काळातील बांधकामाविषयक टूम, बहुराष्ट्रीय स्थावर संपत्ती, भांडवलाची फिरवाफिरव आणि वास्तुशास्त्रीय मत्तेमधील गुंतवण्यासाठी पैसा उपलब्ध होणे, या गोष्टी आता बहुतांश भारतीय शहरांमध्ये वस्तुस्थिती ठरली आहे. सट्टेबाज डावपेचाच्या सहाय्याने संस्थात्मक कारवाईला

एक नवीन मोका म्हणून प्रत्यक्ष रुपाला हातचलाखीने पुढे आणले जात आहे. विकसत जाणाऱ्या या खाजगी गुंतवणुकीची दुसरी बाजू ठरणाऱ्या संकल्पचित्र संरचनेची तरतूद आणि सार्वजनिक वित्तव्यवस्था यांबाबतच्या झगड्यामुळे पेच निर्माण झाल्याचे भाकीत केले आहे, त्यामुळे एकप्रकारे नागरी आणीबाणीत चेतवली जाते आहे, याचा उल्लेख बंगलोरस्थित प्रमुख बिगर सहकारी संघटना 'जनाग्रह'चे प्रमुख अधिकारी रमेश रंगनाथ करतात (वरील टिप 1 पहा) अशा प्रकारे या आर्थिक स्थित्यंतराच्या दशकामध्ये आणखी एका प्रकारची शहरे वाढत्या संख्येने उदयाला येत आहेत, त्यामध्ये वास्तुशास्त्रीय साध्यासुध्या कृती आणि प्रत्यक्षातील जागेसंबंधीच्या युक्त्या-प्रयुक्त्या यांचा समावेश केंद्रस्थानी ठरला आहे.

प्रत्यक्ष स्वरुपातील हातचलाखी काल्पनिक डावपेचांचे ठिकाण ठरते आहे. मुंबईच्या नागरी भूदृष्ट्यातील आमूलाग्र बदलामागे माहिती तंत्रज्ञानाची पद्धती आहे. वैयक्तिक वैशिष्ट्यांची क्षितिजरेषा ही राज्यांकडून केल्या गेलेल्या विविध प्रयत्नांचे दृष्यरुप आहे आणि सामाजिक गृहनिर्माणाची व्यवस्था पाहताना होणाऱ्या नफ्याचे मार्केटमूल्य समजणे आहे. राज्य सरकारी अधिकारी आणि विकासक आपापसात शहरातील रस्त्यांचे नकाशे काढण्यासंबंधात प्रयोग करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला स्थावर संपत्तीच्या किफायतशीर मार्केट तयार करत असताना, घरांच्या टंचाईवर प्रभावी तोडगा काढण्यासाठी .... उपाययोजना करत आहेत. अशा प्रकारे, तत्कालीन काल्पनिक कार्यपद्धतीच्या मुळाशी एका बाजूला विकासाविषयक नियम आणि विनियम आहेत तर जनता दुसऱ्या बाजूला आहे. सर्वसाधारणपणे, झोपडपट्टीत राहणाऱ्या प्रजेला, झोपड्यांमधून आणि मोडकळीस आलेल्या घरांमधून संक्रमण शिबिरांमध्ये हलवण्यात येते, पुनर्विकासासाठी जमीन मिळवण्यासाठी कित्येक दशकांपासून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शहरातील अशा सट्टेबाजीचा उदय आणि शहराच्या औद्योगिक विकेंद्रीकरणामध्ये निश्चित थेट संबंध आहे. मुंबईमध्ये भाड्याने घरे मिळत नाहीत, हे सर्वश्रुतच आहे हे कित्येक दशकांपासूनचे चित्र आहे, 1948 मध्ये जुनी घरभाडी नियंत्रण कायदा अंमलात आल्यानंतर त्यावेळची घरभाडी गोठवण्यात आली आणि भाडेतत्व वंशपरंपरागत ठरवले गेले. परिणामी, साठच्या दशकानंतर भाडेतत्त्वावरील गृहनिर्माणामध्ये लक्षणीय वाढ झाली नाही. विख्यात बांधकाम अभियंता आणि नगररचनाकार शिरीष पटेल यांनी असे निदर्शनास आणून दिले की, या धोरणामुळे झोपडपट्ट्या वाढल्या आणि असंख्य मध्यमवर्गीय कुटुंबांना परवडण्याजोगी भाड्याची घरे उपलब्ध न झाल्यामुळे झोपड्यांमध्ये आणि गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणे भाग पडले.

वसाहतवादी युगामध्ये वस्त्रोद्योगाचे सर्वांत मोठे केंद्र असणाऱ्या ''पूर्वेकडील मँचेस्टर'' अशा या औद्योगिक राजधानीच्या शहराला आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी ''नवीन अर्थकारणाशी'' सुसंगत परिवर्तन घडवणे, भाग पडले. माहिती तंत्रज्ञानातील नवीन अर्थकारणाला आणि अशा नवीन उद्योगांसोबत येणाऱ्या आर्थिक आणि अन्य सेवांना आणि लोकांना वाव देण्याचे महत्त्व अधिकाधिक व्यक्त होत आहे, कारण बंगलोरसारखे लहानसे भारतीय शहरही आंतरराष्ट्रीय भांडवल गुंतवणुकीचे ठिकाण बनले आहे. सासेनच्या शब्दांत 'जागतिक शहर' बनण्याच्या मुंबईच्या प्रयत्नांचे ढासळत जाणाऱ्या सामाजिक संबंधामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशीच नव्हे तर, अगोदरच प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या राज्यातील परिस्थितीशी लढा देणे, अभिप्रेत आहे. हिंसाचाराचा सर्वात ठळकपणे दिसून येणारे प्रकार मुंबईच्या जडणघडणीतच आहे, कारण त्यावर शहरातील वाढत्या जातीयवादाचा ठसा आहे. माणसांविरुद्धचा हिंसाचार आणि मालमत्तेविरुद्धचा हिंसाचार यांच्यामधील संबंध थेटही नाही स्वयंसिद्धीही नाही, त्याचा माग राक्षसी वृत्तीत असल्याचे वाटले, संभाव्य धोक्यापासून आणि आक्रमक शेजाऱ्यांपासून दूरवर लहान-मोठ्या पुनर्मांडणीतून आणि स्थानांतरणातून शहरातील जनतेचे पुनर्वसन होते, त्यातही त्याचा माग दिसून येतो. (व्यक्ती विरुद्धचा हिंसाचार आणि मालमत्तेविरुद्धचा हिंसाचार 'यामधील

गुंतागुंतीच्या संबंधांचा तपशीलवार अभ्यासासाठी अप्पादुराई याचा मिलनेनियल मुंबईमधील स्पेक्टला हाऊसिंग अँड अर्बन क्लिान्सिंग हा लेख पहा)

तिसरे असे की, गुंतागुंतीचे विनियम तयार करून त्याद्वारे लोकांचे विस्थापन लोकांचा मालकीहक्क असणाऱ्या जमिनींचा पुनर्विकास आणि हक्कांमध्ये फेरफार करून त्यांना पुन्हा घरे देण्यासंबंधीची आश्वासने देऊन बिनमालकीच्या जागेवर वसाहती निर्माण करणे किंवा प्रत्येक व्यक्तीला समान चौरसफूट जागेचा ताबा देणे आणि पुन:स्थापन करणे या काही घोटाळ्याच्या योजना आहेत, त्यामुळे सध्याच्या मुंबईतील स्थावर संपत्तीच्या सट्टेबाजीला मदतच झाली. अशा परिस्थितीत लोकन्यायाचा मुखवटा धारण करून केलेल्या जागांची सट्टेबाजी, गरीबांच्या महत्त्वाकांक्षी गुंतवून ठेवत हे शहर प्रचंड स्थित्यंतरातून जाते आहे, त्याला जुन्या जमान्यातील एक प्रयोग एसेही म्हणता येईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, जागतिक राजधानीसाठी प्रचार करण्यासाठी जोडकाम आणि मळलेली वाट तयार करणाऱ्या प्रत्यक्ष इमारतीच्या अनुभवजन्य कृतीचा प्रयोग ठरेल. या सर्व गोष्टी एकमेकांत पूर्णपणे गुंतल्या आहेत. कारण, रहिवासींच्या अस्थिर परिस्थितीशी सट्टा खेळण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणून लोकांचा चलनी नाण्यासारखा वापर करून त्याभोवती स्थापन संपत्तीचे भांडवल खेळते ठेवले जाते. शहराचा 'कायापालट' करण्याच्या नावाखाली विस्थापनाचे प्रतिनिधिक राजधानी म्हणून प्रायोगिक भूचित्र तयार करणे होय, त्यामुळे मुंबई देशातील उर्वरित भागापासून प्रादेशिकरित्या अलग केली आहे.

वरील पृष्ठभाग व भूचित्रविषयक प्रश्नांमुळे ही जागाविषयक स्थित्यंतरे अत्यंतिक महत्त्वाची ठरली आहेत आणि विशेषकरून, त्यांच्यामुळे वास्तुशास्त्राला विशिष्ट मानवशास्त्रीय विषय ठरवले जाते. म्हणूनच, मी या लेखामध्ये शहराचा पृष्ठभागाकडे जागा म्हणून विशेषत्वाने लक्ष केंद्रित केले आहे. ज्यामधून मानाचे आयुष्य कसे साध्य करता येईल या प्रश्नाकडे अधिक वळवेल, अशा गृहनिर्माणाच्या अधिक सर्वसामान्य समस्येकडे लक्ष केंद्रीत केलेले नाही. येथे मला शहरात काय चालले आहे, ते समजून घेण्याबाबत विचार करावयाचा आहे आणि शहराच्या परिवर्तनाचा 'योजनाबद्ध विस्तार' म्हणू नव्या पृष्ठभागाचा जागा म्हणून विचार करावयाचा आहे, हे माझ्या लिखाणाचे उद्दिष्ट आहे. तसेच, मला मुंबईसारख्या शहरामधील, वास्तुशास्त्रीय रुप आणि जागांबद्दलची कल्पनाचित्रे यांच्यातील नातेसंबंध आणि ज्यामुळे सामाजिक उलाढाली घडून येतात त्या दाट लोकवस्तीमुळे, अतिगर्दीमुळे घडणाऱ्या घटना ठळकपणे निदर्शनास आणून देण्याची इच्छा आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या दाट लोकवस्तीचा प्रभाव आणि रोख कल्पनाचित्रांवर असतो आणि वास्तुशास्त्राच्या मुखवट्यामागे, प्रत्येकाचाच, जागांच्या पुराभिलेख अधिक बळकट करण्याच्या गरजेंकरिता सतत झगडा चालू असतो.

मुंबईला अलिकडेच भेट देणारे डॅनियल लिबेस्कींड यांनी असे उद्गार काढले की, 'मुंबई शहराला प्रमुख उद्दिष्ट मानणाऱ्या वास्तुशास्त्रज्ञांना स्पष्टपण टाळणारे शहर आहे. येथील जिवंत माणसे विटा-चुना, काँक्रीट, काच आणि लोखंड याहून कित्येक पटींनी महत्त्वाची आहे. या उद्गारातील मतितार्थ हाच की, मुंबई ही अशी जागा आहे, जेथील वास्तुशास्त्र आपले महत्त्व स्वत:हूनच हरवून टाकते आणि त्याची जागा केवळ दाट लोकवस्ती घेते, तीच त्या शहराचा वरचा दृश्य मुलामा ठरतो. त्याचे पायाभूत पारंपारिक स्थानही अगदी खाली राहते. या सर्वाचा कसा अर्थ लावायचा?

माईक डेव्हिससारख्या इतिहासशास्त्रज्ञाच्या मते, या अफाट झोपडपट्टीतील दाट लोकवस्तीचे वास्तुशास्त्रीय स्वरुप आणि व्यवस्था म्हणजे नव-उदारमतवादी पद्धतीने 'फाजिल मानवता निर्माण केल्याचेच उदाहरण आहे. तरीही, काही विरोधाभास विचारात घ्यावेच लागतील. अलिकडच्या वर्ल्ड बुकमधील लेखानुसार, मुंबई म्हणजे जगातील सर्वात महाग स्थावर संपत्तीवर बसलेली जगातील सर्वात मोठी गलिच्छ वस्ती आहे. मुंबई ही जगात सर्वात मोठी गलिच्छ वस्ती आहे आणि

जगातील महान शहरांना सर्वात मोठे 'भौगोलिक आव्हान' आहे. त्याचवेळी डेव्हीस त्यांच्या 'प्लॅनेट ऑफ स्लम्स' या आताच्या पुस्तकात म्हणतो की, असंख्य मुंबईस्थित नागरिक, मुंबईतील दाट लोकवस्ती आणि ऱ्हास पावणाऱ्या बांधकामाचा संबंध गरीबीशी जोडत नाहीत तर राजकारणाशी जोडतात. वस्तुतः स्थलांतरितांना मुंबई कायम आकर्षित करीत राहिली कारण येथे नोकऱ्या मिळतात, पण उत्पन्नदृष्ट्या मध्यमवर्गीय गणल्या जाणाऱ्या लोकांनाही गलिच्छ वस्तीमध्येच रहावे लागते, कारण स्वस्त घरांचे मार्केटसाठी लागणारी यंत्रणाच अस्तित्त्वात नाही. तथापि, नवीन स्थलांतरितांशिवायसुद्धा मुंबईत असंख्य आणीबाणीचे प्रसंग आहेत, हे तर उघड सत्य आहे. ही आणीबाणी केवळ घरांबाबतची नाही, मुंबईच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीमध्ये अवाढव्य लोकवस्तीच्या फाजिल मानवतेची कल्पना हाच कळीचा मुद्दा आहे.

या कामगारांच्या वर्गाचा शहराच्या बांधकाम प्रकाराशी असणारा संबंध महत्त्वपूर्ण आहे, कारण, शहरातील खाजगी मालमत्तेचे स्वरूप, त्यामागचे धोरण आणि संकल्पना यांच्या ...... कळीच्या मुद्द्यांपैकी एक मुद्दा म्हणजे या अफाट लोकसंख्येचे 'उत्पादक..... चे तर्कशास्त्र आहे. (पाहा : मेम्बे 2004) उदाहरणार्थ, भाड्याच्या घरांची चणचण भासत असल्यामुळे स्वतःच्या मालकीची घरे घेण्यासाठी उपलब्ध साधनसंपत्तीचा विनियोग करण्याच्या किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर खाजगी मालमत्ता आणि खाजगी मालकी स्थापन करण्याच्या दृष्टीने करण्याची प्रत्येकाची क्षमता सीमित करते. याउलट, शहराच्या पायाभूत संरचनाविषयक गरजा जनतेच्या विविध विद्यमान आणि संभाव्य पायाभूत संरचनाच्या जागा ताब्यात ठेवण्याच्या संदर्भात हिशेबात घेतली जाते. उदा. एमयूटीपी (मुंबई नगर परिवहन प्रकल्प) सारख्या वर्ल्ड बँकेकडून निधी दिल्या जाणाऱ्या अलिकडच्या विविध प्रकल्पांनीसुद्धा, मध्यवर्ती ठिकाणांहून विस्थापित होणाऱ्या लोकांसाठी घरे बांधण्यासंबंधात संदिग्ध बोलणी केली आहेत. शहराच्या 'नियमानुसार किंवा तर्कसंगत' विस्तार घडवून आणण्यासाठी किमानपक्षी ज्यांचे व्यावसायिक हक्क मान्य करायला हवेत, अशा रहिवाशांच्या विस्थापनाशी नवीन घरे खऱ्या अर्थी आणि वास्तविकपणे बांधण्याचा प्रत्यक्षच संबंध आहे, असे गेल्या काही वर्षांमध्ये आढळून आले आहे.

दुसरे असे की, शहरात नोकऱ्या उपलब्ध होत असल्या तरीही, श्रमित वर्गाची व्याख्या संदीप पेंडसे यांनी केल्याप्रमाणे ''कष्टकरी वर्ग'' अशीच आहे, उत्पादक ..... (वरीलप्रमाणे) च्या तर्कशास्त्रानुसार पूर्वनिश्चित केलेल्या हलक्या दर्जाच्या आणि विध्वंसक कामांचे प्रकारच शहरातील कष्टकऱ्यांचे अस्तित्त्व दर्शवितात. वस्तुतः औद्योगिककरणानंतरचे मुंबईतील अर्थकारण, ज्या उद्योगधंद्यांनी केंद्रीय, संक्रमणावस्थेतील अर्थकारणाचा ताबा घेतला आहे, अशा प्रकारच्या उद्योगांचे .... समावेश असणाऱ्या संपूर्ण उपखंडाचे वैशिष्ट्य ठरले आहे. उदाहणार्थ, विविध प्रकारचे, पुनर्वापराचे उद्योगसुवर्ण आणि हिरे जडाईच्या उद्योगांच्या, भरतकाम धंद्याच्या चरकात भरडली जाणारी विस्थापित मुले यांच्यापासून नवीन अर्थकारणातील बिनचेहऱ्याचे कष्टकरी यांच्यापर्यंत असंख्य लघुउद्योग आणि धोकादायक व्यवसाय. अधिक दराने तयार केलेल्या उद्योगांमध्ये रात्रपाळीचे कामगार म्हणवले जाणारे 'कुशल कामगार' उत्पादनाची ही क्षेत्रे बहुधा औद्योगिकरणोत्तर जागेमध्ये आणि अशा जागांच्या कडेला असतात. अशा जागा उद्योगधंदे बंद झाल्यामुळे सोडून दिलेल्या असतात किंवा अशा उद्योगांच्या सान्निध्यामुळे दूषित झालेल्या असतात, बंद पडलेल्या कापड गिरण्या इतर मोठमोठी पायाभूत बांधकामे, झोपडपट्ट्या, पडझड झालेली घरे, दलदल, रानटी झाडांनी व्यापलेली जमीन, खाडी, मिठागरे, नद्या आणि टेकड्या असू शकतात. हे वर्तुळ पूर्ण करताना, मोठ्या प्रमाणावर दाट असणाऱ्या लोकवस्तीमुळे निर्माण झालेली जागेची भूक, नफा मिळवण्याच्या उद्देशाने या जनतेच्या दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या गरजांशी तोंडमिळवणी करण्यासाठी अशा जागांकडे वळते.

शहरात इमारती बांधण्यासाठी जागांचा अभाव असल्यामुळे अशा जागांना प्रत्यक्ष भेटी दिल्या जातात, पण

विरोधाभास असा आहे की, अनेकांनी केलेल्या पाहणीमध्ये असे आढळून आले आहे की शहरात तितकासा जागांचा अभाव नाही, कारण शहराच्या मध्यवर्ती क्षेत्रातील जवळजवळ 2600 एकर जमीन बंद पडलेल्या गिरण्यांच्या आणि ऱ्हास पावलेल्या बंदराच्या ताब्यातील आहे. याखेरीज, शहरभरातील सर्व भूखंडांवरील, झोनचा अपवाद, वगळता, तळजमिनीवर सार्वत्रिक मर्यादेद्वारे इमारतींची उंची ठरवली जाते, भाड्याच्या रकमेतील वाढ प्रचारात नाही, कारण भाडी 1940 सालच्या मर्यादेपर्यंत गोठवण्यात आली आहेत. (आणि अजूनही ती तशीच आहेत) राज्य सरकार आणि रेल्वे, नगरपालिका इत्यादींसारख्या त्याच्या एजंटांनी हजारो एकर जमीन, 'अतिक्रमण केलेल्या जमिनीवरील वसाहती किंवा अतिक्रमण झालेली सार्वजनिक बांधकामे यांची जमीन आपल्या मालकीत ठेवली आहे. कित्येक एकर जमीन तशीच पडून आहे किंवा त्यावर झोपडपट्ट्या उठल्या आहेत. या सर्वच गोठवलेल्या जागेमध्ये अतिक्रमण झालेल्या जागेवरील झोपडपट्ट्या किंवा सार्वजनिक बांधकामांचा समावेश होत नाही. ही जागा तसेच संभाव्य जागा ही विकासापासून गोठवण्यात आलेली आहे. पण गोठवलेल्या जागेचे हे दृष्यरुप एका अर्थी दृष्य रुप आहे आणि विशेषकरून, जागांच्या किफायतशीर मार्केटमध्ये शिरण्यास उत्सुक असणाऱ्या, सुधारणावादी खाजगी क्षेत्रांनी उचलून धरल्या आहेत.

या धोरणांमध्ये सर्वसमावेशक सुधारणा होत नसल्यामुळे, औद्योगिक शहराच्या भग्नावशेषातून आंतरिक शहर हळूहळू उदयाला येत आहे. मी यापूर्वी उल्लेखलेल्या जागा, कारखान्यांमधून होणाऱ्या उत्पादनांवर अजिबात अवलंबून नसणाऱ्या नवीन अर्थकारणाचे समर्थन करण्याच्या केवळ उद्देशाने नव्हे, तर कालिक अर्थानुसार त्या औद्योगिकरणानंतरच्या आहेत म्हणून तसा उल्लेख केला आहे, कारण, त्यांचे विषारी पर्यावरण उद्देशपूर्वक मार्केटमध्ये पुन्हा वापरण्यात आले आहे आणि त्यांचे स्थावर संपत्तीच्या उत्पादनांमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. संपूर्ण जगभरातील आणि विशेषत: ज्या शहरांतील उद्योगांचा ऱ्हास दीर्घ काळापासून होत आला आहे अशा युरोपीय - अमेरिकन शहरांमधील औद्योगिकरणानंतरच्या जागांशी तुलना करता, मुंबईतील अशा जागाचे सांस्कृतिक भवितव्य काहीसे कमी प्रमाणात सांगता येईल. बिषारी टाकाऊ पदार्थांचा पुनर्वापर करणे, जहाजांची मोडतोड करणे आणि यांसारख्या अन्य उद्योगांसहित जगभरातील औद्योगिक ऱ्हासाशी संबंधित अशा आत्यंतिक विषारी कामांसाठी मुंबईसारखी अनेक ठिकाणे पिछाडीची कार्यालये झालेली असल्यामुळे, या जागांचे भवितव्य विशेषत: कमी प्रमाणात सांगता येईल. अशा प्रकारच्या कामांमध्ये मुंबईची आपली औद्योगिक संरचना गुंतलेली असताना, नवीन अर्थकारणाच्या जगात आपणच लुप्त होण्याच्या आणि पुनर्वापराच्या बाबतीत त्याच जगाला उपयुक्त ठरत असल्याच्या अशा दोलायमान अवस्थेत अडकली आहे. म्हणूनच मँचेस्टर आणि न्यूयॉर्कसारख्या युरोपीय आणि अमेरिकन शहरांमधील मध्यवर्ती ठिकाणे ठरलेल्या औद्योगिक जागांना पुन्हा उजाळा देण्याच्या पुन्हा नवीन रुप देण्याच्या आणि पुन्हा वापर करण्याच्या काही जनमान्य प्रकल्पांपैकी एखाद्या प्रकल्पाचा विचार करणे कठीण आहे. या औद्योगिकरणानंतरच्या भूदृष्ट्यांमध्ये निराळ्याच प्रकारे फेरउजाळा दिल्याचे दिसून येतो.

कोणत्याही प्रकारच्या संरक्षणाच्या किंवा लोक-चर्चेच्या कक्षेबाहेर जाऊनच एखादे प्रायोगिक शहर किंवा कोणी त्याला भूतपूर्व शहर म्हणो - जन्माला येत असते. अल्पमुदती बदलांच्या अभ्यासामधून नवनवीन भूदृश्ये निर्माण झाली आहेत. त्यामध्ये आता असे प्रश्न उपस्थित झाले पाहिजेत. ही भूदृश्ये लक्षात ठेवण्यासाठी तसेच वास्तविक आहेत, नवीन जागांच्या प्रकारांच्या पर्यावरणातून, विद्यमान बांधकामाच्या वरच्या स्तराखाली लुप्त होणाऱ्या, ऱ्हास पावणाऱ्या, रिक्त होणाऱ्या आणि क्षणभंगूराचा अर्थ व्यक्त होतो आहे. विनाशाच्या त्याचप्रमाणे बांधकामाच्या अशा दोन्ही प्रकारच्या कृतींमधून निर्माण झालेली क्षणभंगूरत्वाचा अर्थ एकीकडे तर त्याचवेळी दुसरीकडे, मुंबईची वैशिष्ट्यपूर्ण

भौगोलिक आणि दृश्यमान सध्याची परिस्थिती. सध्या लिलावाची वाट पाहणाऱ्या आणि स्थावर संपत्तीमध्ये रुपांतरीत होण्याची वाट पहात असलेल्या मध्य मुंबईतील कापड गिरण्यांमधील विणकाम यंत्रांची भयानक शांतता, अनोळखी नवीन पुन:प्रापण प्रकल्पांमधील त्यामध्ये मिठागरे, भाताची शेते आणि रासायनिक कारखाने यांच्या पर्यावरणाशी जोडणारी संलग्न जागा तयार केली जाते. यापुढील भागात मी 'मुंबईचा कायापालट प्रकल्प' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील 'जागतिक दर्जाचे शहर' म्हणून मुंबईचा कायापालट करणाऱ्या अलिकडच्या सार्वजनिक - खाजगी प्रयत्नांचा विशेष उल्लेख करून मुंबईत होणाऱ्या बदलांबाबत चर्चा करणार आहे. या प्रकल्पामागचे माझे आकलन म्हणजे या प्रयोगांमागेच प्रयोजन शोधण्याचा. प्रयत्न करणे आणि मी यापूर्वी म्हटल्याप्रमाणे एक प्रकारचे काल्पनिक साम्राज्य उदयाला आणण्यासाठी या प्रयत्नांची सांगड घालणे.

मुंबईत 2004 मध्ये उघड चर्चा सुरू झाली की, हे शहर नव्याने कसे घडवायचे याचा एक प्रकल्प ज्याचे वृत्तपत्रांची मुंबई घडवणारा प्रकल्प असे वर्णन केले. त्यावेळी या चर्चेस तोंड फुटले. त्यावेळी काही महाजन नागरिकांनी बॉम्बे फस्ट (प्रथम मुंबई) या नावाची एक गैरशासकीय / स्वयंसेवी संस्था स्थापन केली आणि मुंबईचे 'जागतिक दर्जाच्या शहरात' कसे परिवर्तन करता येईल यावर एक अहवाल बनवण्यासाठी मॅक्किन्से अँड कंपनी या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेला भाडेतत्त्वावर बोलावण्यात आले. ''अपूर्व अशी ही कृती होती आणि या शहराच्या वसाहतवादी-इतिहासानंतर प्रथमच शहरावर हक्क सांगणाऱ्या महाजन समुदायाने वास्तव्य गुंतवणूक केल्याचे संकेत यामुळे मिळाले. पूर्वीच्या गुंतवणुकी या लोकहितैषी प्रकारात जमा होत (काम असल्याचे समजल्या जाई) आणि त्या राजकीय क्षेत्रापासून शासनापासून आणि राज्याच्या इतर व्यवहारापासून ही कृती दूर राहत असे. आपल्या नफ्याच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करण्याच्या आणि लोकहितैषी जीवनपद्धतीपासून स्वत:ला एकटे ठेवण्याच्या मोबदल्यात शहराचा प्रथम नागरिक - राजकारण्यांच्या हातातील राजकीय क्षेत्रापासून आणि अधिक शहरांपासून समाधान दूर झाला. मुक्त अर्थव्यवस्था आणि औद्योगिक आर्थिक सत्तेचा ऱ्हास औद्योगिक धोरणातील राज्याचे निसटते नियमन आणि ग्रामीण भोवतालच्या प्रदेशाच्या विकासाच्या अनुग्रहाच्या नावावर शहराचे विकास औद्योगिकरण करण्याच्या राज्याचा जाणीवपूर्वक निर्णय. सेवा-पुरवठा करण्याच्या स्वरुपात शहराचा होणाऱ्या कायापालट याला जलदगतीने सुरू करण्याकरिता अधिक गुंतवणुकीची गरज भासेल हे स्पष्ट झाले. शहरांतर्गत वांशिक धार्मिक गटांमध्ये वाढणारा तणाव आणि जागेच्या बाबतीत श्रीमंत आणि गरीब यांच्यातील चढाओढीमुळे विकासाच्या या मतांबद्दल चीड निर्माण करण्याचे काम केले. काहीवेळा, शहराचे बिघडलेले वातावरण आणि जीवनमानात झालेली घसरण यावर महाजन समूहाने त्याचा दोष या कमजोर वर्गावर प्रतिबिंबित केला.

या प्रकल्पाने गंभीर आणि जीवंत विरोध यांचा उदय, ज्याच्यामुळे शहरातील जागांच्या विकासाचे काम पुढे नेले गेले. जागा मर्यादेच्या नियोजन धोरणाची मशागत यासह शहरांतर्गत लोकांच्यामध्ये यशस्वीरित्या मतैक्याला चालना देण्याचेच फक्त काम केले नाही तर या प्रकल्पाला समर्थन देण्यात जागतिक बँकेला विशेष रुचीसह सज्ज करण्यात हा प्रकल्प यशस्वी झाला आहे. या शहरांतील आणि शहराबाहेरच्या कृतिवीरांनी मॅककिन्से आणि कंपनीचा मुंबईचे स्वप्न अहवाल दस्तऐवज आणि त्याच्या शिफारशी या वस्तुत: बँकेने राज्य शासनाशी अलिकडेच केलेल्या सल्लामसलतीतून शहराच्या कार्यक्षमतेत वाढ. शहराचा आकार आणि प्रमाण याचाच अर्थ कार्यरत राहण्यात आर्थिकतेनुसार परिणाम होणे असा होत असल्यामुळे शहराच्या कामगिरीची क्षमता वाढविण्यासाठी जमीन वापर सुधाराबद्दल कळकळीने विनंती करीत आली आहे. जमीन वापरातील सुधारणा हे एक पवित्र साधन आहे. तसेच आंतरराष्ट्रीय शहराची बरोबर आर्थिक व्यवस्था सुरू

करण्याकरिता किंमत म्हणून भारताने ज्या आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला त्याच्या समकक्ष प्रथान साधणारी गुरुकिल्ली आहे.

यामध्ये चित्तवेधक जर काय असेल तर त 1990 सालाच्या दरम्यान किंवा त्या दशकांमध्ये ज्या सुधारणांना कायद्याचे रुप देण्याचा राज्यशासन प्रयत्नात होते. बहुलोकप्रियता वादी राजकीय सुधारणांनी केलेल्या हानीला विरुद्ध कृतीचे उत्तरामुळे फार मोठ्या टप्प्यांतील संख्येच्या नागरिकांपुढे तंत्रशास्त्रीय उपाय उघड झाले. एका अर्थाने हा वादविवाद लोकमतांमध्ये समस्या आणि प्रश्न निर्माण करणाऱ्या अनेक अभिनयपट्टूंपुढे पेचप्रसंग निर्माण करण्यात यशस्वी झाला. इतकेच काय यापेक्षाही अधिक महत्त्वाची, कारण लोकांसमोर आले जेव्हा शहराचा उत्तरभाग 26 जुलैच्या पुराने पुरता व्यापला, दुपारच्यावेळी आकस्मात जवळजवळ एक मीटर नोंदीच्या पावसाचा तडाखा बसला आणि आधीच भंगूर असलेल्या पायाभूत सुविधा कुचकामी झाल्या आणि परिणामत: जीवितहानी आणि मालमत्तेच्या प्रचंड हानी झाली. मात्र या वेळेपावतो तयार केलेल्या प्रकल्पाला अगोदरच बऱ्यापैकी सुरुवात झाली होती, कमीत कमी सुस्पष्ट दृश्य उपायांच्या मालिकांचे काम चालू झाले होते.

थोडक्यात, सत्ता ग्रहण केल्यानंतर 2004 साली नवीन पंतप्रधानांनी, मुंबईचे शांधायमध्ये परिवर्तन करण्यासाठी केंद्र सरकार आपले वजन वापरेल असे आश्वासन दिले. राष्ट्राच्या चकाचकणाऱ्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न शहराच्या भविष्यावर रोवले गेले. गेल्या ऑक्टोबर महिन्यात राज्य सरकारने अनेकापैकी एक उपक्रमशीलता निवडली आणि म्हणजे अत्यंत निर्दयपणे 90,000 झोपड्या पाडल्या आणि 400000 अशा लोकांना बेघर केले जे 1995 च्या आधीपासून या शहरात ते वास्तव्य करीत होते हे सिद्ध करू शकले नाहीत कारण1995 ही त्यांच्या निवासाला कायदेशीर ठरवण्याची शेवटची तारीख होती. या शहरात कुणी राहायचे आणि कोण राहू शकणार नाहीत हे ठरवण्याठी लोकांचे वर्गीकरण करणे आणि संवर्गीकरण करणे यात 'शेवटचा दिनांक' हे महत्त्वाचे साधन होते.

1995 मध्ये शिवसेनेच्या शासनानेदेखील, 1995 पूर्वी मुंबईत निवास असल्याचे सिद्ध करू शकत होते अशा लोकांना पुनर्वास देण्यासाठी 'मोफत घरांची योजना' सुरू केली होती. या योजनेला पात्र गरीब लोकांना पुनर्वास देण्यासाठी खाजगी विकासकांना प्रोत्साहन देऊन ही योजना आर्थिकदृष्ट्या वर्धनशील बनवली होती. त्यासाठी साधन संपत्तीची व्यवस्था करण्यासाठी आणि त्याद्वारे गरीब लोकांच्या गरजा भागवण्यासाठी, विर्निर्दिष्ट विक्रीयोग्य विकास अधिकार म्हणजेच टीडीआरच्या बाजारभावाच्या साधनांच्या वापराची मुभा दिली होती. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाशी झोपडीधारकाच्या मान्यतेने त्यांच्या झोपडीच्या बदल्यात पक्क्या बराकी देऊन विकास करायचा. त्यासाठी अतिक्रमणातून मुक्त केलेल्या अशा भूखंडावर किंवा इतर भूखंडावर विकासकाला बांधकामाची परवनगी दिली होती आणि झोपडीधारकांना दिलेल्या मोफत घरांव्यतिरिक्तची इतर जागा मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय उपभोक्ताच्या गरजू बाजारात विकण्याचे विकासकाला अधिकार दिले होते. मुंबईतील जागांच्या विपर्यस्त बाजारमूल्यांशी यापूर्वीच चर्चिलेल्या गोठलेल्या जागांचे फलदायित्व हे निर्णायक आहे. मुंबईला जगातील एक अत्यंत महागडी जागांची बाजारपेठ बनवण्यात या विपर्यततेने प्रभाव टाकला आहे. या परिस्थितीमुळे खाजगी विकासकांना आत्यंतिक लाभ झाला तर या कुलुपबंद जागेला मुक्त करण्याकरिता गरीब हे एक चलन ठरले आहे. व्यवहारी भाषेत या कराराशी संमत असलेले झोपडीधारक यांना प्रथम संक्रमण शिबिरात हलवले गेले आणि त्यानंतर आसन आणि विकासक गुंतले आहेत अशा सल्लामसलतीच्या प्रक्रियेने त्याना नेमून दिलेल्या एसआरएस गृहनिर्माणात पुनर्निवासी केले गेले. अशीच योजना गोठलेल्या भाड्याच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी लागू करण्यात आली होती. वर उल्लेख

केल्यानुसार या बेटवत् शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या इमारती ऐतिहासिक दृष्ट्या सर्वांत जुन्या विकास कालखंडातील आहेत आणि त्या दुरुस्ती करण्यापलीकडच्या अगदी मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. बाजारपेठाच्या दृष्टीने त्या कुचकामी ठरल्यामुळे, भाड्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे किंवा ज्या भूखंडावर त्या इमारती उभ्या आहेत. त्या अत्यंत मोक्याच्या मौल्यवान जमीन मालमत्ता भूखंडांच्या विक्रीद्वारे त्यांचे उद्भव विनिमयमूल्य समजून घेणे अशक्य झाले.

म्हणून पुनर्वसनासाठी वैयक्तिक पात्रता आणि त्या जागेच्या समरुप युनिटांचे पुनर्स्थाननिश्चियन हे विकासकच ठरवतो. काही निश्चितच परिमाणाची विक्रीयोग्य चौरस फुटांच्या जागेंचा हक्क मिळवण्यासाठी जर आवश्यक युनिटची संख्या कमी पडत असेल तर त्यानुसार ज्यांना त्या ठिकाणी पुनर्वसनाची गरज अशा भाडेकरूंची किंवा झोपडी धारकांच्या समरुप संख्येच्या आकडेवारीनुसार एकूण संख्येचा मेळ घातला जातो. या योजना बाधित लोकांच्या निरनिराळ्या संवर्गामध्ये जागेच्या कल्पनेतून किंवा मूलभूत सुविधांच्या वागवणुकीतून समानार्थकता निर्माण करते आणि त्यातून शहरी गरीबांची चाकोरीबद्धतेतून वर संवर्ग बनतो. शहरातील बहुल पुनर्रचनेचा मार्ग एका बाजूला अशा काल्पनिक हक्कांची स्थापना जनसमूहाचे विस्थापन तंत्रशास्त्रीय स्वरुपात जोडते आणि दुसऱ्या बाजूला, बांधलेल्या संमिश्र वातावरणाचा वेळोवेळी विकसित झालेल्या सामाजिक चौकटीचा नाश करते. वसलेल्या जागा आणि याचे निरपेक्ष तोडलेल्या भागाचे शहराच्या अद्ययावत अनुभवात प्रतिबिंबित केल्याने विस्थापनाचा आणि या रहिवाशांकरिता निलंबनाचा संमिश्र अनुभवांचा गुंता होतो. मोफत घरांचा हक्क निर्माण करण्यात राज्याच्या सार्वभौमतेचे ठाम विधान म्हणजे अशी प्रक्रिया की ज्यांत जागांच्या वास्तवतेच्या प्रभावी निर्मूलनाची जागा, बाजारात जी फुटकळ ठरू शकते अशा प्रत्यक्षात न उतरवणाऱ्या प्रतिमेच्या बाजूला झुकते. नागरी आत्मनिष्ठता देशपार आणि शास्त्रपारच्या गुणवत्तेवर स्वार होते.

जमीन मालमत्तेचा बाजारात उठाव निर्माण करण्याच्या हेतुसह ज्या सुधारणा घडवायच्या कृतीसुद्धा अशा सर्व सुधारणापर कृती अंतर्गत ज्ञानावर आधारित सहाय्यभूत अटकळीपर संशोधनाच्या आणि एका बाजूने संबद्ध आहेत आणि अचूक स्वरुपाची निर्मिती - म्हणजेच मोफत घरांचा हक्क ज्या परिणामत: बाजारपेठ निर्मितीची यंत्रणा समर्थ करणाऱ्या आहेत. बाजाराची परिकल्पनीय, नफेबाजीचे ऐशिक हितसंबंध हे ज्यांची स्वप्ने आणि आकांक्षा यांच्याशी संबंध आहेत त्यांना या प्रकल्पातील सहभागापासून दूर ठेवलेले आहे. ठोकताळ्याने म्हटल्यास जे कष्टकरी वर्गाचे आहेत आणि अनिवार्य नवीन शहरासाठी त्यांच्या श्रमाच्या स्वरुपात ते ज्यांना हा सहभाग खर्चिक आहे असेच विस्थापित होणारे लोक आहेत.

या शोधनिबंधाच्या शेवटच्या परिच्छेदात तत्कालीन शहरातील नागरिकात्वाच्या संस्कृती आणि चमत्कारशास्त्रावर या प्रायोगिक रंगमंचाच्या वास्तव परिणामाकडे मला वळायचे आहे.

भविष्यात या शहराचे काय होईल याचे भविष्य सांगण्याच्या दृष्टीने असे करण्यात मला स्वारस्थ नाही.

निरनिराळ्या अभिनयपटूंच्यातील कटकारस्थानांचा अभ्यास म्हणून हे अभिनयपटू, राजकारणी, अधिकारशहा, विकासक आणि आंतरराष्ट्रीय जमीन-मत्तेचे भांडवल. परंतु मला जर कशात स्वारस्य असेल तर ते जागतिक भांडवलाचे ठराविक रूप म्हणून जमीन मालमत्तेची निर्मिती आणि प्रसृतीकरण यामधील आंतरछेद आणि शहरातील दारिद्र्याचा उन्मादवायू यांच्या अभ्यासात आहे आणि पिळवणूक स्थितीची परिकल्पनेची विशिष्ट अवस्था काढून टाकली आहे. या उन्मादवायुमुळे सध्याच्या चालू गोठण्याच्या हीच अवस्था करत आहे आणि जागेकरता बाजारपेठेत अडथळा आणत आहे. हा अडथळा व्यवहाराची नेहमीची सवय आणि शास्त्रपार करून आणत आहे आणि त्यामुळे निवासी लोकांना अपेक्षांच्या गर्तेत ढकलून देऊन, अनंतकाळापर्यंत प्रतीक्षाधीन ठेवण्याची अवस्था निर्माण करून आणला जातो

### गंडांतराचा / अरिष्टांचा काळ

पूर्ववर्ती विश्लेषणावर आधारित भविष्याच्या शहराच्या मूलभूत तार्किकता ही अशारीतिने काही ठराविक गृहितके अशी की, नागरिकत्वाच्या व्याप्त कार्यात्मक चौकटीत निर्माण केलेली शहरी गरीबाचे हक्क - म्हणजेच दावे आणि गरजा यांच्या परिणाम स्वरुप निर्माण केलेले हक्क म्हणजेच एक प्रकारची संपत्ती आहे ती जागासाठी बाजारपेठ निर्मितीच्या प्रक्रियेत मोकळ्या हाताने उधळावयाची आहे, असा युक्तिवाद एखादी व्यक्ती करू शकेल. गरीबाचे वाया गेलेले जीवन, त्याची खर्चिकतेची क्षमता आणि त्यांना हीणकसमूल्य करणे या गोष्टी भविष्याचा पायाभूत तर्क ठरवतात. तसे ते नाही पण मी यापूर्वी म्हटले त्याप्रमाणे कटासंबंधीच्या कार्यात्मक युक्तीवादात चांगले शहर आणि पालकत्वाचे नागरिक यांच्या विकासाला मोडता घालतात. जुन्यांना जी नवीन रुपे जवळ करतात वर्तमानाला मोडीत काढते आणि भविष्याकडे दुर्लक्ष करतात असे जे भासते त्या चमत्कार शास्त्रीय अवस्थेमध्ये मला रस आहे. एफएसआय, टीडीआर आणि त्याचप्रमाणे इतर यासारखी इतर निरनिराळी नियोजनाची साधने ही बांधकामाला समर्थ बनवणारी हत्यारे ठरली आहेत. आपण पाहतो की, बांधलेल्या भूदृश्याचे तऱ्हेवाईक फेरबदल आपण पाहतो. पायाभूत सुविधा आणि त्यामुळे प्रमाणित जीवनमान या संज्ञाच्या रुपाने शक्य ती तार्किकता व्याख्यांकित केल्यानंतर या इमारती ‘उभ्या राजकारणा’चे नवीन प्रतिक बनण्याऐवजी नागरिकात्वाच्या स्वभावात सुबोध बदल करतात आणि परिणामत: केवळ आसपास राहण्यापासून ते बांधलेल्या धाग्यांत परिवर्तन घडण्यापर्यंत बदलतात.

या बेटाच्या पृष्ठवंशतेने सोपानक्रमाचा अधिकार परंपरेच्या नाट्यात त्रिमितीय विपर्यासाची भर घातली आहे. ती म्हणजे वगळणे आणि ताबा सोडणे. बांधलेल्या धाग्यांच्या विरुद्धचे सान्निध्य ठेवलेली ही बांधकामे शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनामध्येच फक्त परिवर्तन घडवतात असे नव्हे तर ती जागा कल्पिली आहे. तिच्या प्रातिनिधिक क्रमवारीत समरुपतेनेसुद्धा परिवर्तन घडवतात. बाजारपेठांच्या दृष्टीने ते अस्तित्त्वात असलेले बांधकाम देतात आणि तरीही बांधावयाची जागा झोपडपट्टीची जागा, भाडेनियंत्रणाखाली इमारती, कारखाने, वटवारी खार जमिनी, तिवरांच्या जागा, शहरातील खेडी आणि औद्योगिक वसाहतींच्या जागा, ज्या सद्यस्थितीत ‘अक्षम’ आणि ‘लुप्तप्राय’ आहेत अशा जागा ते देतात. दुसऱ्याच शब्दांत या प्रक्रियेमुळे या जागा बहुविध ऱ्हास विनिमय मूल्यात बदलतात. प्रारंभ होणारे हे उभे शहर अशारितीने सान्निध्याच्या केवळ बलाच्या विरुद्ध ही बांधकामेच अशी अप्रचलित भूदृश्ये देईल. आता कर्तव्यात कसूर केल्याचे आपल्याला दिसले.

वसाहती एकत्रीकरण आणि निगम-नफा यामधील डळमळीत क्षेत्राच्या दिक्कचालनानंतर हे फेरबदल परिकल्पनेच्या कृती म्हणून आणि तपासणी यंत्र म्हणून किंवा आरसा ज्यात भविष्याचे अवलोकन करता येईल असा आरसा म्हणून अर्थपूर्ण आहेत. या शहराचे भवितव्य तरंगते आहे. खुद्द जमिनीवर ती उभारलेली नाही तर ती जमीन निर्माण करावी लागली, विनिमयाच्या वाट नसलेल्या बंद कोठडीसारखी ती विनाकुलुपाची तशीच सोडून दिली. विस्थापनेच्या अधीन राहून ते तरंगेत जगत् तरंगत्या लोकसंखेसह तसेच चालू राहिले. नागरी जागांचा ‘अधिक सक्षमतेने’ वापर करण्याच्या दृष्टीने ज्याला कुठेही हलवल जाऊ शकते असा हा जनसमूहाचा संवर्ग होता. याचा अस्सल पुरावा म्हणजे शहरी गरीब लोक ज्यांच्या या शहरी विकासासाठी खोट्या-चलनाप्रमाणे एक साधन म्हणून वापर झाला. सध्याच्या विकासाच्या प्रक्रियेच्या अपयशाचे धनी आणि या शहराच्या पुनर्रचनेकरिता साधनसंपत्ती वाहून न्यावयाच्या वाहन अशा दोन्ही ठिकाणी त्याचे अस्तित्त्व आहे. ज्यांनी आपली उघडी डोकी झोपडपट्टी स्थितीच्यावर ठेवली. त्या सर्व इतरेजनांचे जग अदृश्यरुपी ठेवण्यात आले, कारण निवासाच्या हक्कासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा

परिणाम फक्त शहराच्या बाह्य विस्तारात झाला. त्यामुळे या लोकांचे परिघीय अंतरापासून ते केंद्रस्थानापर्यंत अशा धावपळीत भरपूर वेळ खर्च करणाऱ्या पासधाऱ्यांच्या प्रवासी लोकसंख्येत रुपांतर करण्यात आले. जागा निर्मितीच्या सध्याच्या तर्काच्या तार्किकतेपासून त्यांना तोडण्यात आले. कारण त्यांनी व्यापलेली जागा ही अद्यापही देवाणघेवाण करण्याजोगी किंवा विक्रीपात्र जागा नाही.

या शहरात निवाऱ्याचे हक्क हे मालमत्ताधारक नागरिकत्वाचे हक्क नाहीत. त्यापेक्षा ते निवासाचे हक्क कमी करून शिल्लक राहिलेले लोक म्हणून फिरत्या लोकसंख्येचा मुक्काम करण्याचे हक्क बनवला जातो. मालमत्तेतील जागा अस्तित्त्वाचे स्वरुप क्षणभंगूरतेचे हळूहळू ऱ्हास होणारे यांच्या निरनिराळ्या रुपांशी निगडीत असल्याचे पाहता येईल. लवचिक नियोजनाची तात्विकता ही समाजिक घटना नव्हे तर भविष्यातील स्थिर आणि एकजिनसी कल्पना लागू रत विशुद्ध कालदर्शक घटना ठरण्यासाठी कालावधी घेते. तथापि, ज्यांचे मी वर्णन करीत आलो आहे ती लवचिक आणि गतिशील केलेल्या भूचित्रांचे प्रकार विलंबनाच्या जाणीवेसह म्हणजेच सर्वसाधारणपणे विस्थापन, पुनर्स्थापन निश्चयन, विज्ञानपार यांच्या सामाजिक प्रस्तावनेसह विलंबनातील अवधीच्या जाणीवांनी भरलेले असतात. जे आपण आपल्या खोपटात भूतकाळातील ठराविक तारखेपासून (तारीख स्वत:च वेळोवेळी बदलत राहत) राहत असल्याचे खाजगी विकासकाला विकास हक्कांच्या विनियम करताना सिद्ध करू शकतात. झोपडी धारकांना मोफत घरे देऊ करणे आणि झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे यासारख्या खरोखरच हक्कांवर आधारित विकास योजनांचे समर्थन करण्यात आले. एका नामवंत क्रियाशील कार्यकर्त्याने जाहीर केले की, झोपडीधारकांना झोपडपट्टी जमीनदोस्त करण्याच्या धमकीपासून संरक्षण देण्याची ही योजना मान्य केली गेली. जेथे झोपडी पाडून टाकणे ही स्थायी आणि निश्चितप्राय भाती असते. एसआरए योजनेत कायमच्या काही वेळ संपूर्ण जीवनभरच्या अपेक्षेच्या भोवऱ्यातून मुक्त केले. बाजार आणि जागांची जाणीव यामध्ये पाठपुरावा करण्यातील लवचिक नियोजन प्रक्रियेच्या भूचित्रातील कलाचातुर्यांची संयुक्त जोडणी चाचरताना दिसते. राज्याची उपस्थिती किंवा तरतूद करण्यासंदर्भातील अनुपस्थिती, विषयांचे विचित्र जग निर्माण करतात. अकार्यक्षमतेच्या जनत केलेल्या स्थितीवर केलेली हातचलाखी आणि हस्तांतराने यांच्या मालिकांनी अवधी आणि जागा यांचे राज्याचे अनुभव पकडले जातात जे फिरून तर क्षणभर प्रत्यक्ष स्थितीत मूलपरिवर्तन करतात. दुसऱ्या शब्दांत ते भूलतत्त्वादीत्वाने काल्पनिक लौकिकतेच्या जागेतच पकडलेले आहेत. या परिकल्पनेच्या जागेत, नियोजन, आधुनिकता, बांधकामचक्र आणि बिमोड याची लौकिकता हे डोकीफुटीकडेच नेतात.

बंदिस्त जागांविषयींचे सुस्पष्ट अलंकारशास्त्र भविष्यातील स्वप्नांची हमी देत असल्याचे दिसते. बंदिस्त रचनांच्या वातावरणातील प्रमाणकानुसार हे स्वप्न पाहिले जाते, हे शहर शांघाय किंवा सिंगापूर सदृश्य असले पाहिजे आणि म्हणूनच तिची पुन्हा जोडाजोडी केली पाहिजे. आधुनिक नियोजनाच्या उच्च पुरोहिताद्वारे हंगामी प्रतिकूल क्षेत्रातील अन् आधुनिक आणि अद्यापपर्यंत आधुनिक नसलेले अशा दोन्ही वर्गीकृत यांच्यावर संपूर्ण भूतकाळाच्या खुणांचे जतन करणारा किंवा विनाश, विकृती किंवा रोग यांच्या तिटकारा आणण्याऱ्या खुणा पुसणारा म्हणून कडक टीका केली जाते. त्यांच्या मते भविष्यातील शहर हे एकजीनसीपणासह मिळवले पाहिजे आणि ते आधुनिक बांधकाम तज्ञांच्या कष्टाने तयार होते. तथापि हे उपाय कल्पक वैध स्वरुपात बेतुन त्याचबरोबर नमुन्याच्या विशिष्ट रचनांसह बेतले पाहिजेत.

ही जोडाजोडीची कामे शहरनिर्मिती आणि सहअस्तित्व त्याचप्रमाणे भिन्नभिन्न बांधीव रचना यांच्या अशक्यतेवर प्रस्तावना म्हणून सांगितली जातात. त्यामुळे वरवर पाहता गृहनिर्माणाच्या गंडांतराखालील निरपेक्ष आणि अपेक्षित उपाय म्हणून उभ्या इमारतींच्या उदयास पसंती मिळाल्यासारखे वाटते. उलटपक्षी जो पर्यंत उदारमतवादी

कल्पना असलेली नागरिकता कायम मालमत्तेची हमी देत होती फक्त स्थिर काय असेल तर या शहराच्या क्षणभंगूर जगात- शहराला ही जाणीव झाली की आपला कब्जा करून घेण्यात येईल. मालमत्तेच्या स्थायीभावामुळे नागरिकत्वाची उदारपणे हमी दिली जाते. शहराच्या अल्पकालीन जागेत हा स्थायीभाव यामुळेच ताब्यातून काढून घेण्याच्या जाणीवेला कारणीभूत होतो आणि त्यातूनच नागरिकत्वाच्या नवीन ढाच्याची हमी देतो.

**भूतपूर्व शहर**

हे बदल आसपासच्या संकल्पचित्रावर अस्थिरता लादतात. मी असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला आहे की अशा प्रकारची अस्थिरता ही मूळातूनच कालिक असते. जुन्या आणि नवीन रचनांचे सान्निधिकरण संपूर्ण भूदृश्याच्या पुर्नअर्थांक्लनांकडे नेते आणि ती उदार उदाहरणांतील परिक्वतेतील नवीन बांधकाम रचनांचा समर्थ करणाऱ्या सध्याच्या बांधकाम रचनांच्या भूतल वास्तवाला पुसून टाकतो.

परंतु वास्तव आणि क्षमता असलेल्या कार्याची शृंखला अयशस्वी ठरते. ही अयशस्वीता 26 जुलै, 2006 रोजी झालेल्या पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीने होते किंवा 11 जुलै, 2006 रोजी प्रवासी रेल्वेवर झालेल्या बॉम्बस्फोट मालिकांसारख्या घटनांनी होते. मुंबई शहर हे अशा रितीने त्यांचे नागरिकत्व, त्यांच्या मालतत्ता, त्यांचे उदरनिर्वाह रूपी चलन यांचा वापर याद्वारे शहराच्या पुनरसंकल्पनाबाबतची मर्यादित केसचे उदाहरण म्हणून मुंबई शहराकडे बोट दाखवता येईल. बंदिस्त वातावरण आणि मत्ता यामधील संबंधाद्वारे, शहरी नागरिकत्वाच्या पुनर्विचार करता नवीन उपलभ्य निर्माण झाले आहे आणि हे उपलभ्य सार्वजनिक लोकांच्या खाजगी आणि गैरशासकीय क्षेत्र यांच्या अभिकरणाच्या संबंधातून निर्माण झाले आहे. शहरी संकल्पचित्रे प्रक्रियेत आढळणारी ही स्थित्यंतरे आणि परिवर्तने ही फक्त टोकाचीच आहेत असे नव्हे तर शहरी नागरिकत्वाच्या विनाशाच्या भविष्याची बिजे त्यात स्पष्टपणे अंतर्भूत आहेत. मुंबईच्या स्थित्यंतराच्या वृतान्त हा आहेत असे नव्हे तर शहरी केंद्राच्या जाळ्यात स्वत:च्या बेट अवस्थेत असल्याचेच सांगतो. त्यासंबधी तिची चर्चा राष्ट्रीय विकासाच्या संदर्भात चर्चिला जाण्याऐवजी भारतात आणि भारताच्या बाहेरही अशा रितीने मुंबईच्या या कहाणीचा अभ्यास इतर जागतिक शहरांच्या विशेषत्वाने परिकल्पनीय स्थित्यंतराबरोबरच जागतिकीकरणाच्या युगात त्याच्या भविष्याच्या क्षणभंगूरते बरोबरची प्रयोगात्मक कृती म्हणून केला पाहिजे . जे परिकल्पनेत निर्माण होते ते भविष्य त्याने प्रत्यक्ष कृतीला सुरुवात करण्यापूर्वीच इतिहासजमा होते म्हणून औद्योगिकोत्तर मुंबईच्या विशिष्ट मानवजातीशास्त्रीय आलेख म्हणजे परिकल्पनीय राजधानीच्या काळात भविष्याच्या स्वत:च्याच संवर्गाच्या परिवर्तनाच्या विशालतर मानवजातीशास्त्रीय आलेखाच्या दिशेतील एक पाऊल आहे.

**अनुवादक : दत्ता कुलकर्णी**

■ ■ ■ ■ ■

